**सरकारतर्फे साक्षीदार क्र.५ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – प्रवीण मोहनराव राठोड,

वय – ४१ वर्षे, व्यवसाय– नोकरी,

नेमणुक – कासारसिरसी पोलीस स्टेशन ता.निलंगा, जि. लातूर.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एन. मेहेत्रे यांचे मार्फत सुरुः–**

मी दि.१२/०७/२०२४ पासून कासारसिरसी पो.स्टे. येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक तथा प्रभारी पोलिस अधिकारी या पदावर कार्यरत आहे. गुन्हा रजिस्टर नंबर ५८/२०२५ चा तपास माझ्याकडे आला होता. सदरचा गुन्हा बी.एन.एस. कलम ३३१(४) आणि ३०५ अन्वये नोंद होता.

२. सदर गुन्हयाचा तपास माझ्याकडे आल्यानंतर मी घटनास्थळ पंचनामा केला होता. घटनाठिकाण मदनसुरी येथील विश्वकर्मा ज्वेलर्स या दुकानात होते. त्या दुकानातील दिसत्या परिस्थितीचा दोन पंचाच्या समक्ष मी पंचनामा केला होता. तो पंचनामा मला दाखवल्यास मी ओळखु शकतो. (आता मला प्रस्तुत प्रकरणातील दि.२५/०३/२०२५ रोजीचा निशाणी १५ वरील घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला.) तो पंचनामा मी दोन पंचाच्या समक्ष घटनाठिकानावर प्रत्यक्ष दिसुन आलेल्या परिस्थितीप्रमाणे केला होता. त्या पंचनाम्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. त्याच्यावर दोन पंचाच्या आणि माझी सही आहे.

३. मी घटनाठिकाणावर लातूर येथील फिंगर प्रिंट तज्ञांच्या कडून त्या दुकानामध्ये

फिंगर प्रिंटस मिळतात का याबाबत तपासणी केली होती. त्यांचा तपासणी अहवाल मी प्रस्तुत कामात दाखल केला आहे. तो अहवाल दाखवल्यास मी ओळखु शकतो. (आता मला दि.२४/०३/२०२५ रोजीचा फिंगर प्रिंट तज्ञांचा घटनास्थळाचा तपासणी अहवाल दाखवण्यात आला.) तो अहवाल तोच आहे. त्याच्यावर अंगुली मुद्रा शाखा, लातूर यांचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अमित कुमार बबन पुणेकर यांची सही आहे. त्यांच्याशी माझा नेहमी पत्रव्यवहार होत असतो त्यामुळे मी त्यांची सही ओळखतो. त्यास **निशाणी क्र.२८** देण्यात आली.

४. त्यानंतर प्रस्तूत गुन्हयातील साक्षीदाराचे तपास टिपन नोंदवले होते. प्रस्तुत गुन्हयाचा पुढील तपास मी पी.एस.आय अजय पाटील यांच्याकडे दिला होता. कासारसिरसी पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस अधिकारी म्हणून मी प्रस्तुत गुन्हयातील मुद्देमाल व इतर कागदपत्रे मिळण्याकरीता अहमदपुर पोलीस स्टेशनमध्ये अर्ज पाठवला होता. त्या अर्जाची पोहच आम्हाला अहमदपुर पोलीस स्टेशनमधुन मिळाली होती. (आता मला त्या अर्जाची पोहच दाखवण्यात आली.) त्याच्यावर माझी सही आहे. तसेच अहमदपुर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांची सही आणि शिक्का आहे. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.२९** देण्यात आली. सदर अर्जाद्वारे मागणी केलेले कागदपत्र पोलीस उपनिरीक्षक अजय पाटील यांच्या ताब्यात मिळण्यास विनंती केली होती.

<u>उलटतपास आरोपीतर्फे अॅड. एच. व्ही. गायकवाड यांच्यामार्फेत शपथेवर सुरु–</u>

५. मी केलेल्या तपासामध्ये आरोपीने १०८ पैंजण जोड चोरी केल्याचे निष्पन्न झाले नव्हते. चोरी झालेल्या दुकानाचा नंबर मला सांगता येत नाही. मी त्या दुकानाच्या

मालकीचे कागदपत्र घेतले नव्हते. त्या दुकानामधून ठसे असलेल्या वस्तु जप्त केल्या नव्हत्या. त्या दुकानातून सोने ठेवण्यासाठी वापरण्यात आलेले डब्बे मी जप्त केले नव्हते. फिर्यादीने त्याच्या दुकानातील वस्तु कोठून खरेदी केल्या होत्या याचा तपास मी केला नव्हता. फिर्यादीकडे त्याच्या दुकानामध्ये किती वस्तु होत्या याची मी चौकशी केली नव्हती अथवा तसे रेकॉर्ड तपासले नव्हते. पंचनामा करणारे पंच हे फिर्यादीचे नातेवाईक आहेत हे मला सांगता येत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळावर जाऊन पंचनामा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी केलेला तपास खोटा व चुकीचा होता. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

**सदर साक्षीदारचा जबाब आरोपीस व्ही.सी द्वारे हजर केल्यानंतर नोंदवण्यात आला. सदर जबाब नोंदवतेवेळी ऑडिओ व व्हीडीओ सुस्थितीत चालु होता.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2026.02.27 11:02:20 +0530

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांक–२६/०२/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,
निलंगा